# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २३.०६.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नंदनवन पोलीसांची कामगिरी :— अट्टल वाहन चोरास अटक, ९,१०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त.**

दिनांक १४.०६.२०२६ चे २२.३० वा. ते दिनांक १५.०६.२०२६ चे ०८.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी इफा अली साजीद अली वय १८ वर्षे रा. हसनबाग, गुड्डु भाई पानठेल्यामागे, नंदनवन, नागपूर यांनी त्यांची बजाज पल्सर १५० मोटारसायकल क्र. एमएच ४९ बीजे ३१४५ किंमती ७०,०००/—रू. ची, राहते घरासमोर लॉक करून, पार्क करून, ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद दुचाकी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्याचे तपासात, नंदनवन पोलीसांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, सापळा रचून, आरोपी विवेक दुर्याधन ढाकणे वय २६ वर्षे रा. प्लॉट क्र. ११, गजानन महाराज मंदीरजवळ, हनुमान नगर, पोलीस ठाणे अजनी, नागपुर यास एका ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ४९ पी ८०६२ सह ताब्यात घेतले. त्यास वाहनासंबंधी कागदपत्रे विचारली असता, त्याने कोणतेही कागदपत्र सादर केले नाही. तसेच त्यास वर नमुद गुन्हयातील पल्सर गाडीविषयी विचारपुस केली असता, त्याने वाहनचोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने, आरोपीस गुन्ह्यात अटक करून, त्याची पोलीस कोठडी प्राप्त करण्यात आली. त्यादरम्यान केलेल्या चौकशीत आरोपीने वरील गुन्ह्यातील वाहनाव्यतिरिक्त इतर एकुण १२ दुचाकी वाहने चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन १) पांढरी ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ४९ पी ८०६२ किंमती ८०,०००/—रू. २) ग्रे ॲक्टिवा क्र. एमएच ४९ एबी ७२७० किंमती ७०,०००/—रू. ३) काळी ॲक्टिवा गाडी क्र. एमएच ४९ एएम ६५९३ किंमती ७०,०००/—रू. ४) काळी लाल प्लेझर गाडी क्र. एमएच ३१ डीपी ९१२८ किंमती ३०,०००/—रू. ५) ग्रे ॲक्टिवा क्र. एमएच ४० एपी ३६३० किंमती ७०,०००/—रू. ६) काळी ॲक्टिवा क्र. एमएच ३१ ईएक्स ३३४७ किंमती ७०,०००/—रू. ७) होंडा ड्रिम मोटारसायकल क्र. एमएच ४९ क्यु १४०८ किंमती ९०,०००/—रू. ८) होंडा शाईन मोटारसायकल क्र. एमएच ४९ एम ४४२० किंमती ७०,०००/— रु. ९) होंडा स्प्लेंडर एमएच ३१ सीझेड ७२१० कि. ७०,०००/— १०) अवेंजर मोटारसायकल क्र. एमएच ४९ ए ८३८३ किंमती ८०,०००/—रू. ११) ग्रे ॲक्टिवा क्र. एमएच ४९ आर ८६२८ किंमती ७०,०००/—रू. १२) ग्रे ॲक्टिवा क्र. एमएच ३१ एडब्ल्यु ७२९३ किंमती ७०,०००/—रू. अशी एकूण १३ वाहने कि. ९,१०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस

आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. कैलाश देशमाने, सपोनि उमाकांत राठोड, पोहवा विश्वजीत उके, योगेश डफ, पोअं. राकेश म्हैसकर यांनी केली.




**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस.**

दिनांक ०१.०६.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक ०७.०६.२०२६ चे २१.१५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, प्लॉट नं. ९०, श्रीनगर, दर्शन कॉलनी, नंदनवन नागपुर येथे राहणारे फिर्यादी सुरेश जानबाजी आकरे वय ६२ वर्षे हे आपले राहते घराला कुलूप लावून परिवारासह द्वारका, सोमनाथ येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आत प्रवेश करुन, लोखंडी आलमारीतील रोख ४५,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १,३१,८००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसून आले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पाळत ठेऊन आरोपी नामे चेतन मनोज बुराडे वय २४ वर्षे रा. गल्ली क्र. १४, जगतापचे घराजवळ, नंदनवन झोपडपट्टी, नागपुर यास केडीके कॉलेजजवळील मैदानातुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचेजवळ सोन्याची लगड वजनी ४४ ग्राम कि. ४,४०,०००/— रु. ची मिळून आली. मुद्देमालाबाबत त्यास विचारपूस केली असता, त्याने वर नमुद घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन सोन्याची लगड कि. ४,४०,०००/— रु. ची जप्त करण्यात आली आहे. घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव नंदनवन पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. बाबुराव राऊत व पथकाने केली.



**३) गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाची कामगिरी :—**

दिनांक १८.०६.२०२६ चे १०.०० वा. ते १७.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत राहणाऱ्या ४१ वर्षीय फिर्यादी यांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही राहते घरी कोणाला काहीही न सांगता घरून निघुन गेली होती. ती घरी परत न आल्याने, तिचा शोध घेतला असता, ती मिळुन आली नाही. तिचे अल्पवयीन असल्याचा फायदा घेवुन, तिला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले. अशा फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे कलम १३७(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी दिनांक २३.०६.२०२६ रोजी माहीती मिळाली की, नमुद मुलगी ही एका संशयीत मुलासोबत गोरेवाडा भागात राहत आहे. अशा माहीतीवरून तेथे जावुन, पाहणी केली असता, तेथे नमुद मुलगी ही संशयीत मुलासोबत राहत असल्याचे दिसुन आले. दोघांनाही ताब्यात घेवुन, त्यांची सविस्तर विचारपूस केली. मुलीचे समुपदेशन करण्यात आले. दोघांनाही पुढील कारवाईस्तव हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील व त्यांचे पथकाने केली.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे एमआयडीसी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २३.०६.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, सेंट्रल एमआयडीसी रोड, ब्लिज शोरुमचे विरूध्दबाजुला एक इसम शस्त्र बाळगून उभा आहे. अशा प्राप्त माहितीवरून घटनास्थळी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम दिसून आला. तो पोलीसांना पाहून पळाल्याने, पाठलाग करुन त्यास ताब्यात घेवून पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव आदित्य सुर्यभान सुरदुसे वय २४ वर्षे रा. साईनगर, पाणी टाकीजवळ, वाडी, नागपूर असे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आंत कंबरेत एक लोखंडी चाकू कि. ३००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर** :— कु. दिव्या रविंद्र कोरचाम वय २० वर्षे रा. प्लॉट नं. १६, सुर्योदय नगर, साईनगर—०१, हुडकेश्वर ही दिनांक १८.०६.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस—काळे लांब, अंगात— जांभळी टि—शर्ट व निळया रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर** :— संजय वसंतराव ठाकरे वय ५७ वर्षे, रा. प्लॉट क्र. ४८, बाल हनुमान नगर, हुडकेश्वर रोड, नागपूर हे दिनांक २०.०६.२०२६ रोजी १६.०० वा. पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांब, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ९ इंच, केस—पांढरे, अंगात— नेव्ही ब्ल्यु रंगाची टि—शर्ट व पांढरा पायजामा घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात. वेडसर असून घरुन निघून जाण्याचे सवईचे आहेत.



कु. दिव्या



संजय

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १८ वे सहदिवयाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०१७००/ २०१७ | कलम ४,२५ भा.ह.का. | १)अंकुश डी. खारोले<br>२) संदीप उर्फ गोलू रामचंद्र चोपडे वय २१ वर्ष दोन्ही रा. इंदीरामाता नगर, झोडापे च्या घराजवळ, एमआयडीसी नागपूर | २१.०७.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**